दिनांक : १८/०५/२०२४

# प्रेस नोट

लोकसभा निवडणूक २०२४ च्या ५ व्या टप्प्यांतील मतदान दि. २०/०५/२०२४ रोजी होणार असून बृहन्मुंबई शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

मुंबई पोलीस दलाकडून ५ अपर पोलीस आयुक्त, २५ पोलीस उप आयुक्त, ७७ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २४७५ पोलीस अधिकारी व २२१०० पोलीस अंमलदार व ०३ दंगल काबु पथक (RCP) बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत.

त्यांचेसोबत अतिरिक्त मदतीकरीता १७० पोलीस अधिकारी व ५३६० पोलीस अंमलदार व ६२०० होमगार्ड असे मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. तसेच महत्वाच्या ठिकाणी ३६ केंद्रिय सुरक्षा दले (CAPF / SAP) यांची बंदोबस्तकामी नेमणूक करण्यात आलेली आहे. असे एकुण २७५२ पोलीस अधिकारी, २७४६० पोलीस अंमलदार, ६२०० होमगार्ड, ०३ दंगल काबु पथक (RCP),३६ केंद्रिय सुरक्षा दले (CAPF / SAP) निवडणुक बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत.

लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झालेचे दि. १६/०५/२०२४ रोजी पासून आज पावेतो विविध कायद्याअंतर्गत मुक्त आणि निष्पक्ष निवडणुक पार पाडण्याकरीता एकुण ८०८८ लोकांवर प्रभावीपणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

याद्वारे सर्व मतदारांस आवाहन करण्यात येत आहे की, लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने फौ.दं.प्र.सं. कलम १४४ अन्वये दि. १५/०५/२०२४ रोजी मुंबई पोलीसांकडुन आदेश प्रसारीत करण्यात आले असुन मतदान केंद्रांच्या १०० मीटर परीघात (मतदान केंद्र परिसर) आणि मतदान केंद्राच्या आत मोबाईल फोन इत्यादी न बाळगता किंवा न वापरता नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

***